CMYK

बीड । बुधवार

१८.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ७८

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बीड जिल्हा परिषदेचा कारभारी पुन्हा बदलला

## दहा दिवसापूर्वी आलेले मंगरूनाथ यांच्या जागी आता वर्ध्याहून आले जितिन रहमान !

### बीडमध्ये येण्यास अधिकारी निरुत्साही !



**बीड । प्रतिनिधी**

दहा दिवसापूर्वी सामान्य प्रशासन विभागाकडून तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची प्रशासकीय बदली करण्यात आली होती. जुन यांचा कार्यकारही जिल्हा परिषद मध्ये पूर्ण होऊ शकला नाही. यातच पुन्हा जिल्हा परिषद चा कारभार मंगरूनाथ यांच्या हार्दिक सोपवण्यात आला. ६ जून रोजी यांची बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बदली करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र सामान्य प्रशासन विभागातून परत नवीन आदेश निर्गमित करण्यात आले असून वर्धा येथील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जितिन रहेमान यांची बीड येथील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

बीड जिल्हा नेहमीच अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वादग्रस्त ठरलेला आहे. यापूर्वी अनेक वेळा मर्जीतील अधिकारी नसल्याने त्यांची कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदरच बदली करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी पासून जिल्हा पोलीस अधीक्षक व राजपत्रित अधिकाऱ्यांनाही वेळापूर्वीच बदलीला सामोरे जावे लागले आहे. बीडच्या राजकारणात अधिकाऱ्यांच्या बदलीसाठी अनेक किस्से प्रसिद्ध असून बीडच्या मुख्य कार्यकारी पदावर मंगरूथानातं हे कोणाला नको होते. यातच नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी बीडला येण्यास अनु उत्साही असल्याने त्यांना सेवा जेष्ठता नुसार वरिष्ठ पदावर नियुक्त करण्यात येणार आहे. मात्र दहा दिवसात असे काय घडले ज्यामुळे बीडच्या जिल्हा परिषदेचा कारभारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमधील नामांकित शाळेकडून वह्या खरेदी करण्यासंदर्भात जबरदस्ती

## शासन परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या शाळेवर कारवाई करा : अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक सत्रास दिनांक १६ पासून सुरुवात झाली आहे. बीडमधील संस्कार विद्यालय बीड या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय वह्या शाळेमार्फतच खरेदी करण्यासाठी व्हॉट्सअँपद्वारे संदेश पाठविण्यात आला आहे ही कृती पूर्णपणे नियमबाह्य, अन्यायकारक आणि आर्थिक शोषण करणारी आहे.

शाळेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या वह्यांचे बाजारमूल्य सरासरी ३० रुपये असूनही विद्यार्थ्यांना त्या ५५ ते ६० रुपयांना विकल्या जात आहेत. यामुळे प्रत्येक वहीमागे १५ ते २० रुपयांचा अतिरिक्त खर्च पालकांच्या खिशातून होत आहे. सुमारे २० वह्यांवर ३०० ते ४२० रुपये अतिरिक्त खर्च पालकांना सोसावा लागत



वहा

उपक्रमासाठी कोरी वही – १०० पाणी – ५ वही

वरीलप्रमाणे एकूण २१ वह्या विद्यार्थ्यांना घेतल्या जात आहेत. हे संपूर्णपणे अनावश्यक, अतिरिक्त आणि व्यापारी हेतूने केलेले वाटते.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी शिक्षण अधिकारी यांचीत त्वरित भेट घेत विद्यार्थ्यांना शाळेतून जबरदस्ती वह्या खरेदी करण्यास भाग पाडू नये. पालकांना स्वतःच्या निर्णयानुसार वह्या/साहित्य बाजारातून घेण्याची मुभा द्यावी. शाळेकडून वह्यांची किंमत वाढवून घेतल्याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी. शाळेमध्ये वह्या विक्री करताना ऋध्द किंवा ग्राहक सेवा केंद्र आहे का याचीही चौकशी करावी. भविष्यात अशा जबरदस्तीच्या विक्रीवर बंदी घालावी तसे परिपत्रक जाहीर करावे पालकांच्या भावनांचा विचार करून आपण त्वरित योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे यावेळी निखिल सवाई, मिलिंद सरपते, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सोन्याच्या दुकानातून चांदीच्या चैन चोरणाऱ्या चार महिलांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून बीड बस स्थानकात महिलेच्या तसेच प्रवाशांच्या गळ्यातील सोने,मौल्यवान वस्तू चोरी झाल्याच्या अनेक तक्रारी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखलआहेत.या सोने चोर टोळीचा तपास अद्यापही बीड पोलिसांना लागणार नसून दिनांक १७ रोजी कुंदन बालासाहेब जोगदंड, वय २३ वर्ष, रा कानडी रोड, केज यांनी पोलीस ठाणे केज येथे फिर्याद दिली की, त्याचे स्वतःचे श्री ज्वेलर्स नामक दुकाणामध्ये अज्ञात चार महीलांनी गिऱ्हाईक म्हणुन येऊन पायातील चांदीची चैन विकत घ्यायची आहे दाखवा असे म्हणुन बऱ्याच चांदीच्या चैन पाहील्या व फिर्यादीची नजर



चुकवुन चांदीच्या चैन चोरुन नेल्यावरुन त्याचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे केज येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील गुन्हा उघडकीस आनण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आनण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक १७.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, चोरीस गेलेला चांदीचे चैन जोड चोरलेल्या महील्या हया चांदीच्या चैन विक्री करण्यासाठी कोठे तरी जात असुन सध्या बसची वाट पाहत नगर नाका, नगर रोड, बीड येथे उभ्या आहेत अशी खात्रीलायक बातमी मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लागलीच सदर ठिकाणी जावुन छापा मारुन १) सुमन पोपट येडवे, वय ५२ वर्ष, २)कलावती मोतीराम केंगार, वय ५६ वर्ष, ३)बबीता भाऊराव केंगार, वय ६१ वर्ष, ४) व्दारकाबाई सतीष बोराडे, वय ४० वर्ष, सर्व रा. मुर्शदपुर ता.जि.बीड यांना ताब्यात घेतले व त्याचे कडे असलेल्या पर्समध्ये पाहीले असता पर्समध्ये चोरीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाठलाग करुन दिंद्रुड पोलिसांनी वाळूचा हायवा पकडला

**बीड । प्रतिनिधी**

दिंद्रुड पोलिसांनी वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनाचा पाठलाग करत मोठी कारवाई केली आहे. पोलीस पाहून कारवाईच्या भीतीने वाहन चालकाने पळ काढत वाहन गावात घेवून वाळू रिकामी केली. मात्र दिंद्रुड पोलिसांनी तात्काळ पाठलाग करून वाहनासह चालकाला अटक करत गुन्हा दाखल केला आहे. ही घटना दिनांक १७ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास तेलगाव परिसरात घडली. वाळूची चोरी सुरू असल्याची माहिती दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्यानंतर त्यांनी त्यांच्या पथकासह तात्काळ



खाजगी वाहनातून संबंधित ठिकाणी धाव घेतली. मिळालेल्या माहितीनुसार ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा पोलीस प्रशासन आणि परिवहन अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ रिक्षाचालकांवर दंडात्मक कार्यवाही

**बीड । प्रतिनिधी**

दि.१६ जून आणि आज १७ जून २०२५ रोजी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन, आणि परिवहन अधिकारी स्वप्नील माने,प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री बालाजी धन्वे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त विद्यमाने ३१ रिक्षाचालकांवर वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष आणि पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या अधिपत्याखाली



शहरातील विविध भागात वैध कागदपत्र नसलेल्या इतर जिल्ह्यातील भंगारात काढण्यात आलेल्या रिक्षावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, काल पासून आज पर्यंत पोलीस प्रशासन आणि परिवहन विभागाच्या संयुक्त विद्यमाने एकुण ३१ रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली असून बीड शहरात अनेक अवैध रिक्षा असून त्यामध्ये कागदपत्रांची पुर्तता नसलेले, विमा नसलेले, परमिट नसणारे रिक्षा, पीओसी प्रमाणपत्र नसलेले, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेवून जाणारे ज्यामध्ये नागरिकांचा जीव देखील धोक्यात येवू शकतो अशा रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली यावेळी

यावेळी सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक पवन गायके, सहाय्यक मोटर निरीक्षक भूषण पेटकर , ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय जगताप यांचा समर्थकांस राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्षात प्रवेश

### आ.संदीप क्षीरसागरांनी केले नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

राजकारण आणि समाजकारणात सातत्याने सक्रिय असलेले, बीड पंचायत समितीचे माजी उपसभापती अरूण जगताप यांचे सुपुत्र धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक समर्थकांसह, आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे मंगळवारी (दि.१७) रोजी धनंजय जगताप यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम पार पडला. यावेळी धनंजय जगताप यांनी आपल्या अनेक कार्यकर्ते

▶▶ उर्वरित पान २ वर




# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सुनावणी २४ जूनला होणार !

## विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची उपस्थिती; वाल्मीक कराड यांच्यावर आरोप निश्चितीचा युक्तिवाद !







**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकळण्यात आली आहे. बीड येथील विशेष मकोका न्यायालयाचे न्यायाधीश रजेवर असल्यामुळे (१६ जून) रोजी होणारी सुनावणी आता २४ जून रोजी होणार आहे की सुनावणी विशेष मकोका न्यायालयात पार पडणार होती. वाल्मिक कराडच्या आरोप निश्चितीबाबत युक्तिवाद होण्याची शक्यता होती. दरम्यान आजच्या सुनावणीत काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होणार होते. मात्र न्यायाधीशांचा अनुपस्थितीमुळे सर्व कारवाई पुढे ढकलण्यात आली असून पुढची तारीख देण्यात आली आहे.

बीडच्या मस्साजोश येथील सरपंच संतोष देशमुख बांबी हत्या करण्यात आली होती. त्यानंतर त्यांचे कुटुंब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फडणवीस यांना भेटण्यासाठी गेले असता, त्यांनी विराज देशमुखच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली होती, त्यानुसार आता विराज देशमुख हा सांगली जिल्ह्यातील रेठेधरण येथील सैनिकी शाळेमध्ये शिक्षण घेणार आहे. याबाबतचे पत्र वर्षा निवासस्थानी झालेल्या सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय, देशमुख यांना सुपूर्द करण्यात आलेय. यावेळी औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार तसेच आमदार सदाभाऊ खोत यांची देखील उपस्थिती होती. ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# शहरांतील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण हवेच !

सर्व सोयी सुविधांनी युक्त असलेली मुंबई समस्त हिंदुस्थानची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहराच्या बाबतीत असे म्हटले जाते कि इथे कोणीच उपाशी राहू शकत नाही. तुमची मेहेनत करण्याची सिद्धता असेल, तर तुमचे शिक्षण असो किंवा नसो रोजगाराच्या नानाविध संध्या तुम्हाला इथे सहज उपलब्ध होतात. इथे तुम्हाला लहानमोठे कोणतेही व्यवसाय करायचे असल्यास तुम्हाला भांडवल उपलब्ध करून देणारे अनेक मार्ग आहेत, इथे तुम्हाला राहण्यासाठी किंवा व्यवसायासाठी भाड्याने जागा उपलब्ध आहेत, रहदारीची मुबलक साधने उपलब्ध आहेत.

शाळा, महाविद्यालये, बाजारहाट, रुग्णालये अगदी हाकेच्या अंतरावर आहेत. सश्रद्धांसाठी मंदिरे आणि प्रार्थनास्थळे जागोजागी आहेत, पर्यटनासाठी समुद्रकिनारे, प्राचीन ठिकाणे आहेत, मनोरंजनासाठी सिनेमा आणि नाट्यगृहे आहेत. तुमच्या खिशात पैसे आहेत तर इथे अशी कोणतीही वस्तू नाही जी विकत मिळत नाही. मुंबईत नशीब आजमावण्यासाठी आलेल्या आणि गडगंज श्रीमंत झालेल्यांची उदाहरणेही इथे पुष्कळ आहेत त्यामुळ प्रतिदिन देशभरातून लोंढेच्या लोंढे मुंबईकडे रोजगारासाठी धाव घेतात. बांगलादेशी घुसखोरांची तर इथे मोजदादच नाही. मुंबई नजीक असलेल्या ठाणे आणि नवी मुंबई शहराचीही काहीशी हीच स्थिति आहे. वीज, पाणी यांसारख्या अत्यावश्यक बाबींचा पुरवठा करणारे स्रोत, रस्ते, वाहतुकीची साधने मर्यादित असल्याने या वाढत्या लोकसंख्येचा भार त्यावर पडून इथे वर्षनुवर्षे राहणाऱ्या भूमी पुत्रांचे जीवन असह्य झाले आहे. मुंबईतील वाढत जाणारी गर्दी, वाढत्या वाहनांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वर्षातील बाराही महिने सुरु असलेल्या विकासकामांमुळे आणि टोलेजंग इमारतींच्या बांधकामांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात पसरलेले धुळीकण आणि त्यामुळे होणारे वायुप्रदूषण, श्वसन विकार. जमिनीला आणि घरांना मिळणारे सोन्याचे भाव यामुळे मुंबईतील अनेक भूमिपुत्रांनी मुबईतील घरे विकून बदलापूर, कर्जत, वांगणी यांसारख्या ठिकाणी अल्प दारात घरे घेऊन संसार तर थाटले आहेत; मात्र यातील कर्त्या पुरुषांची (कमावत्या महिलांचीही) कार्यालये, कंपन्या मुंबईत असल्याने प्रतिदिन सकाळी मुंबईत येताना आणि सायंकाळी मुंबईतून घरी जाताना त्यांना जीवावर उदार होऊन रेल्वे प्रवास करावा लागतो आहे. लोकल रेल्वेसेवा ही तुलनेने स्वस्त आणि जलद असल्याने तसेच तिन्ही जिल्ह्यांत याचे जाळे पसरलेले असल्याने लोकांकडून प्रवासासाठी या मार्गालाच अधिक पसंती दिली जात आहे. गेल्या काही वर्षांत लोकल रेल्वेवरील भार कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने नानाविध प्रयत्न केले आहेत. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दोन गाड्यांतील कालावधी अल्प केला, लोकल गाड्यांची संख्या वाढवली, गाड्यांच्या फेऱ्या वाढवल्या, १२ डब्यांच्या लोकलगाड्या १५ डब्यांच्या केल्या, जलद मार्गाचे थांबे वाढवले; मात्र ज्या तुलनेत प्रवाशांची संख्या वाढते आहे त्या तुलनेने हे उपायसुद्धा निष्फळ ठरत आहेत. कार्यालयीन वेळेत रेल्वे गाड्या दुथडी भरून वाहत असतात. गुरांना कोंबावे तशी माणसे या गाड्यांतून कोंबून प्रवास करतात, कितीतरी जण जीव मुठीत घेऊन रेल्वेच्या दाराबाहेर लटकत प्रवास करतात ज्यामध्ये स्त्रियासुद्धा मोठ्या प्रमाणात असतात. मुंब्रा येथे घडलेला अपघात हा देशभर गाजला असला, तरी लोकल रेल्वेमार्गावर गर्दीच्या वेळेत प्रतिदिन कितीतरी जण धावत्या रेल्वे गाड्यांतून पडून मरण पावतात तर कित्येक जण कायमचे जायबंदी होतात. सध्या पावसाळा सुरु आहे. पावसाळ्यात रेल्वे डब्याच्या पायदानवर पाय ठेवून प्रवास करणारे प्रवासी अनेकदा पाय घसरून पडतात, गर्दीच्या वेळेत प्लॅटफॉर्मवर उतरतानाही बऱ्याचदा अपघात होतात. लोकल रेल्वेवर पडणारा भार कमी करण्यासाठी प्रशासन शहरी भागात मेट्रो रेल्वेचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र अनेक ठिकाणी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे ही कामे थांबलेली आहेत. ज्या ठिकाणी कामे सुरु आहेत, तीही अत्यंत संथगतीने सुरू आहेत. त्यामुळे जेव्हा केव्हा त्या ठिकाणी मेट्रोसेवा सुरु होईल तोपर्यंत लोकसंख्या एव्हढी वाढलेली असेल कि त्या तुलनेत मेट्रोही अपुरी पडावी. मुंबईत अनेक ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण सुरु आहे, मोठमोठे उड्डाणपूल तयार करण्यात आले आहेत, भुयारी मेट्रो मार्गही बनवण्यात आले आहेत. मुंबईत समुद्राखालून कोस्टल रोड सुरु झाले आहेत'; मात्र ज्या तुलनेत आज शहरातील लोकसंख्या वाढतआहे त्या तुलनेत हे सर्वच मार्ग अपुरे पडून सर्वांचा भार पुन्हा लोकल रेल्वे गाड्यांवरच पडत आहे. लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे; मात्र या आवाहनाला खासगी कंपन्यांकडून हवा तसा प्रतिसादही मिळताना दिसत नाही. वर्तमानात शहरातील लोकल गाड्यांची वाढती गर्दी पाहिल्यावर आज जी मुले शालेय शिक्षण घेत आहेत ती जेव्हा कमावती होतील तेव्हा त्यांचा लोकल गाड्यांचा प्रवास किती भयावह असेल याची कल्पनाही करवत नाही. लोकल ट्रेनचे अपघात कमी करण्यासाठी सर्व लोकल गाड्या वातानुकलीत आणि स्वयंचलित उघड झाप करणाऱ्या दरवाज्यांच्या करणे नक्कीच सोपे नाही त्यासाठी भरपूर सिद्धता करावी लागेल, ती नाही केली तर रोगापेक्षा इलाज भयंकर होऊ शकतो.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई यांसारख्या शहरातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी उपयोयोजना आखणे आणि त्याची कठोरपणे अंमलबजावणी करणे आज नितांत गरजेचे आहे. दुसरी बाब म्हणजे ज्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी या विकसित आणि विकसनशील शहरांत आहेत, त्या देशातील अन्य शहरांत का निर्माण होऊ शकत नाहीत याचाही विचार प्रत्येक राज्याने करणे आवश्यक आहे. राज्यातील बेरोजगारी कमी करायची असेल तर प्रत्येक राज्यांतील प्रत्येक शहरांत मुंबईच्या तोडीच्या सोयी सुविधा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात. आपल्या राज्यातील एकही तरुण आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या पोटाची भूक भागवण्यासाठी राज्याच्या बाहेर जाणार नाही याची काळजी प्रत्येक राज्यातील शासनाने घ्यायला हवी. कायद्यानुसार देशात कोणीही कोणत्याही राज्यात किंवा शहरात चाकरी अथवा व्यवसाय करू शकतो हे ऐकायला जरी चांगले वाटत असले, तरी मूळ मुंबईकरांना आज काय हाल सोसावे लागत आहेत हे मुंबईकरांनाच विचारावे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

## बीड जिल्हा...

महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाला बदलावा लागला. बीड जिल्हा परिषद मागील काही वर्षात भ्रष्टाचाराचा अड्डा बनवला आहे. बोगस कामे, यासह बदल्यांचे राजकारण, शिक्षण व बांधकाम विभागात असलेला भ्रष्टाचार नियमानुसार कोणतेही कामे होत नसल्याची ओरड बीड जिल्हा परिषदेचे विरोधात कायम आहे. शाळा दुरुस्ती व नूतन बांधकामासाठी आलेल्या निधीवर अधिकारीच दला मारतात यासह ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. यासह जलजीवन पाणीपुरवठा योजना ,नळ योजना अनेक योजना थंड बस्त्यात आहेत. तत्कालीन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी अनेक गंभीर विषयावर बोट ठेवले. प्रत्यक्ष कामे झाल्याशिवाय कोणाचेही बिल देणार नसल्याची भूमिका आदित्य जीवने यांनी घेतली होती. हेच कारण त्यांच्या बदलीचे मानले जाते. जिल्हा परिषद विभागातील अनेक अधिकारी कर्मचारी आदित्य जीवने यांच्या बदलीसाठी देव पाण्यात ठेवून होते. प्रशासनाने आदित्य जीवने यांची बदली केली व या ठिकाणी मंगरूळनथ यांची नियुक्ती ही करण्यात आली. मात्र पुन्हा माशी कुठे शिंकली मंगरूळ नातं यांच्या जागेवर वर्धा येथे कार्यरत असलेले जितीन रहमान यांची उचल बांगडी करत त्यांच्याकडे बीड जिल्ह्याचा जिल्हा परिषदेचा कारभार सोपवण्यात आला आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद परिसरात हे येणार नसल्याची चर्चा होतीच. बीड कडे येण्यासाठी अनेक अधिकारी उत्साही नसल्याने बीडला चांगला अधिकारी मिळणे अवघड झाले आहे. येथील राजकारणांना अधिकारी त्यांच्या मर्जीनुसार काम करणारा हवा असतो विरोध केला व बोगस कामावर बोट ठेवल्यास त्याच्यावर बदलीची कारवाई तात्काळ केली जाते. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ नेतेही अधिकाऱ्यांच्या बदलीसाठी थेट मंत्राच्या दारात असतात. बीड जिल्हा परिषद म्हणजे ग्रामीण भागातील रक्तवाहिनी व मिनी अर्थ पुरवठा करणारे मंत्रालय म्हणावे लागेल. जिल्हाभरातील रस्ते दुरुस्ती यासह विविध कामे जिल्हा परिषद अंतर्गत केली जातात या ठिकाणी शिक्षण व आरोग्य विभाग ही कार्यरत असून बांधकाम विभागाकडे खास लक्ष असते. बीड जिल्हा परिषद मागील अनेक

पान १ वरून पुढे...

वर्षापासून सभासद व अध्यक्ष विना कार्यरत आहे यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत कोणता पक्ष जिल्हा परिषद ताब्यात घेणार यानंतर येथील अधिकाऱ्यांनी केलेले कारणान जनतेसमोर येणारच मात्र मंत्रालयातून दहा दिवसाच्या आतच बीड येथे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची बदलीचे आदेश निघतात यामागे नेमके कारण काय प्रश्न बीडमधून उपस्थित होत आहे.

## बीडमधील नामांकित...

लखन जोगदंड, प्रेम कांबळे यांच्यासह पालक उपस्थित होते. पुस्तके,वह्या,स्टेशनरी,ड्रेस,शूज खरेदी करण्यासंदर्भात सक्ती करू नये.

**बीडमध्ये शाळेवाले काहीही नवीन उपक्रम घडवून शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकाला आर्थिक भुर्दंड कसा होईल व आपल्याला कसा फायदा होईल याकडे जास्त भर देतात. शाळेचा वॉट्स अँप ग्रुपवर संदेश पाठवला की विद्यार्थी पालकांजवळ हट्ट धरतात त्यामुळे अशी सक्ती करू नये. यानंतर असा गैरप्रकार शाळेने केल्यास पालकांनी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क करावा सदर शाळेविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करू असे आवाहन करण्यात येते. – अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)**

## सोन्याच्या दुकानातून...

गेलेले चांदीचे चैन दिसुन आल्या. त्यांनी सदरील चैन केज येथील सोन्याचे दुकाणामधुन चोरल्याचे कबुल केले. त्याचे कडुन चोरीस गेलेले चांदीचे चैन जप्त करुन महीला आरोपी व चांदीचे चैन पुढील तपासकामी पोलीस ठाणे केज यांचे ताब्यात दिले आहेत. सदरील कारवाई नवनित कॉंवत,पोलीस अधीक्षक, बीड,सचिन पांडकर,अपर पोलीस अधीक्षक, बीड,शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, विष्णु सानप, सचिन आंधळे, महीला पोलीस स्वाती मुंडे, चालक नितीन वडमारे यांनी केली आहे.

पान १ वरून पुढे...

## पाठलाग करून....

भारत बॅन्ज कंपनीच्या हायवा वाहन (मूल्य अंदाजे ₹ २५ लाख) द्वारे वाळूची बेकायदेशीर वाहतूक सुरू होती. पोलिसांच्या हालचाली लक्षात येताच हायवा चालकाने वाहन तेलगाव ते परळी रोडमार्गे चाटगाव कडे वळवून गावातील एका गल्लीतील घराजवळ वाळू रिकामी केली व तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र दिंद्रुड पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यास ताब्यात घेतले व वाहन चालकासह हायवा पोलीस ठाणे दिंद्रुड येथे आणले. तपासादरम्यान संबंधित वाहन चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक रॉयल्टी परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे दत्ता परसराम थावरे (वय ५३, रा. आनंदगाव, ता. माजलगाव, जि. बीड) याच्याविरुद्ध गु.र.नं. १५२/२०२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले भारत बॅन्ज कंपनीचे हायवा वाहन जप्त करण्यात आले असून याचा तपास पोलीस हवालदार/९११ डोईफोडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. ही महत्त्वाची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई विभाग) श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, पोलीस हवालदार युवराज श्रीडोळे, पोशि महेश साळुंके, आणि पोशि सचिन गायकवाड यांनी केली. या कारवाईने वाळू माफियांना चांगलाच दणका बसला असून स्थानिक नागरिकांकडून दिंद्रुड पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

## जिल्हा पोलीस...

वाहन चालक लक्ष्मण पांगरे, कैलास दराडे, अशोक कंटाळे यांच्यासह जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार आदिनाथ, विष्णू, राजाभाऊ, पांडूरंग, शिवदास, सखाराम, पोलीस अंमलदार विश्वजीत, सिध्दार्थ, अनिकेत, वसीम, ड्रायव्हर पोलीस हवालदार संतोष, ड्रायव्हर पोलीस अंमलदार दत्ता, पोलीस कर्मचार्यांनी कार्यवाही केली आहे.

पान १ वरून पुढे...

दरम्यान पोलीस प्रशासनाकडून आणि परिवहन विभाग नियमात राहुन सर्व कागदपत्रांची पुर्तता रिक्षाचालकांनी/वाहनधारकांनी करावी आणि क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी न घेवू जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## धनंजय जगताप...

आणि समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश घेतला. यावेळी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे आ.संदीप क्षीरसागरांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## संतोष देशमुख....

बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या प्रकरणात वाल्मीक कराडसह इतर आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. या घटनेतील कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे. गेल्या सुनावणीत देशमुख हत्या प्रकरणात आरोप निश्चिती बाबत पुरेसे पुरावे असून आरोप निश्चिती करून घ्यावी, असा अर्ज उज्वल निकम यांनी न्यायालयाला सादर केला होता. तर वाल्मीक कराडच्या वकीलांकडून अद्याप सरकारी पक्षाकडून डिजिटल एव्हिडन्स मिळाले नसल्याचं म्हणणे मांडण्यात आलं. तर वाल्मिक कराडच्या दोष मुक्तीच्या अर्ज न्यायालयात प्रस्तावित केला आहे. या प्रकरणाची मागील सुनावणी ३ जून रोजी पार पडली. या सुनावणीसाठी सरकारी वकील उज्वल निकम यांची उपस्थिती ही होती मागच्या सुनावणीत आरोपी वाल्मिक कराडच्या आरोप निश्चितीबाबत महत्त्वाचा युक्तिवाद करण्यात आला होता. आरोपीच्या वकिलांना डिजिटल एव्हिडन्स प्राप्त व्हावेत यासाठी वाल्मिक कराडच्या वकिलांकडून मागणी करण्यात आली होती याच मुद्द्यावरून पुन्हा युक्तिवाद सुरू होण्याची शक्यता होती मात्र विशेष मकोका न्यायालयाचे न्यायाधीश रजेवर असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.

पान ४ वरून पुढे...

## सांची बुद्ध...

या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे,शारदा ताई तांगडे, वंचित बहुजन आघाड़ीचे भारत तांगडे,अंकुश आण्णा जाधव,श्रीमंत डोंगरे,सदधम्म सेवासंघाचे ट्रस्टी अरुण पोटभरे,नवनाथ गायकवाड,आप्पासाहेब भारस्कर,शेलापुरीचे उपसरपंच नाथाजी घडसे,पत्रकार किसन भदर्गे, सह परिसरातील धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्तीत होते या कार्यक्रमाला मंदाताई साळवे यांनी भोजनदान दिले तसेच या कार्यक्रमाचे सुत्र संचलन शहर अध्यक्ष प्रा एल आर मस्के यांनी केले तर आभार तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे यांनी मानले या ठिकाणी बुद्ध दर्शन सहल करुण आलेल्या धम्म उपासकांचा सत्कार करण्यात आला,या कार्यक्रमासाठी दयानंद साळवे, नितीन डोंगरे, बाबासाहेब घनघाव,चक्रधर पोटभरे,भगवान डोंगरे,मोहन काकडे,बळीराम काकडे,डी पी वाघमारे,डी पी पोटभरे शिवाजी कासारीकर,कोमल डोंगरे,विमल साळवे,वैशाली गायकवाड,निलावती साळवे,वैभव साळवे सह तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## परळी नगरपालिकेचा...

सोलार पथ दिवे, ते फक्त शोभेची वस्तू झाली आहे. तसेच भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर मधील अनेक भागात व मुख्य चौकातही हीच अवस्था आहे. जुने हाय मास व पददिवे बंद पडले आहेत. फक्त आणि फक्त मेंटेनन्स अभावी बंद पडले आहेत. तात्काळ बंद पडलेले सर्व पथदिवे, हाय मासट चालू करा अशी मागणी या भागातील नागरिका कडून होत आहे.

## विविध मागण्यासाठी....

प्रत्यक्ष पातळीवर त्याची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई व टाळाटाळ होताना दिसून येत आहे.या सर्व प्रकरणाची सोडवणूक व्हावी व दप्तर दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर-कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी.या आशयाचे वरिष्ठ पातळीवर बेमुदत धरणे आंदोलनाचे निवेदन दिले असताना सुद्धा त्यावर कोणतीच कारवाई होताना दिसून येत नाही. त्यामुळे बेमुदत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहेत. आणि भविष्यातही जर याची दखल घेतली गेली नाही तर, या आंदोलनाची व्याप्ती निश्चितच वाढत जाणार आहे. असा इशारा महासंघाचे जिल्हा संघटन प्रमुख भारतभाऊ टाकणखार, ता. सचिव अभिमन्यू इबिते, जि.उपाध्यक्ष वसंतभाऊ टाकणखार, रवी आदमाने, हनुमंत पांढरपोटे, राजेंद्र सातपुते, शिवाजी भाळशंकर, राहुल खुणे, गोरख उघडे, निलेश गावडे, किरण शिंदे, नारायण भाळशंकर, अमोल राऊत, धोंडीराम रामुळे, जीवन डोंगरे, किरण माने, सय्यद आयुब, नागनाथ पडलवार, प्रवीण जाधव, सुमित घाडगे, गोविंद पवार, शंकर पवार, बळीराम घनगाव, नितीन पुटटेवाड, शेख मतीन, विजय वैराग्य, अविनाश येळंबकर, कृष्णा

पान ४ वरून पुढे...

हौसरमल, राजकुमार सोनवणे, प्रतीक स्वामी व तालुकाप्रमुख राहुल टाकणखार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## जुना बाजार...

ते बलभीम चौक,कारंजा रोड राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पऱ्यांत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठ – मोठाले खड्डे पडून सामान्य नागरिकांना रहदारीसाठी मोठा अडथळा येत आहे.शहरातील हा प्रमुख व्यापारी मार्ग असून दररोज या ठिकाणी जिल्हाभरातून नागरिक विविध व्यवसायाच्या निमित्ताने येतात तसेच सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर पाणी साचलेला असतो यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. यामुळे तात्काळ कोतवाली वेस ते जुना बजार,बलभीम चौक,करंजा रोड,राजुरी बेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम सुरू करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वार्ष ताई जगदाळे (महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष) याच्या नेतृत्वाखाली येत्या ३० जून सोमवार रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते राजुरी बेस,छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये बेशरम चे झाडे लावून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची प्रशासनाने दखल घ्यावी असे मनसेच्यावतीने बीड नगरपरिषद कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) आशा कुटे (बीड जिल्हाध्यक्ष) कल्पना कवठेकर (जिल्हा उपाध्यक्ष) अमरजान पठाण (बीड शहराध्यक्ष) सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वावी गावात...

मार्गदर्शन करणार आहेत यावेळी गावचे सरपंच नवनाथ गर्जे आणि उपसरपंच भारत गोल्हार तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते

## पाटोदा येथे...

इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. भूमिपूजनप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने, प्रियदर्शनी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पवनकुमार मोरे, कन्या शाळेचे मुख्याध्यापक सचिन खोले, श्रीकांत लांडगे, बबन राख, पोपट उगले, संकेत माताडे, जयश्री शेलार, नवनाथ ठाकणे, अनिल राख, प्रताप नवले, मुळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान, विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा देण्याच्या दृष्टीने इमारत बांधकामाचा निर्णय घेण्यात आला.

## डॉ. बाबासाहेब...

चोवीस तास होत आहे. यामुळे परिसरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (५०) उत्कृष्ट राहून तापमान दोन ते तीन डिग्रीने कमी झाले आहे. डॉ. ठोंबरे हे नाविन्यपूर्ण अशा अटल आनंद घनवन संकल्पनेच्या सुरुवातीचा आणि

पान ४ वरून पुढे...

अंमलबजावणीचा प्रथम स्त्रोत होत. डॉ. ठोंबरे यांनी निसर्गप्रेमी, पक्षी अभ्यासक, वृक्षमित्र व नागरिकांसाठी हरित प्राणवायू उद्यान व ध्यानधारणा करणाऱ्यांसाठी योगापार्कच्या माध्यमातून कृषि महाविद्यालय परिसरात नंदनवन फुलविले आहे. कृषि विद्यापीठात ३० वर्षाच्या सातत्यपूर्ण सेवेत त्यांनी पदाचे एकेक शिखर पदाक्रांत केले आहे. आज ते लातूर येथील कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता या पदाची धुरा समर्थपणे पेलत आहेत. तत्पूर्वी ते कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य या पदावर कार्यरत असताना त्यांनी अत्यंत उल्लेखनीय कार्य केले आहे. कृषि विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याबरोबरच त्यांनी महाविद्यालयात राबवलेल्या विविध उपक्रमांतर्गत वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, अटल घनवन वृक्ष लागवड, योगापार्क, ऑक्सीजन हब इत्यादी संकल्पना त्यांनी राबवल्या. परिसरात व गाव शिवारात अत्यंत अल्पावधीत एकूण २ लक्ष विविध प्रजातीच्या वृक्षाची लागवड करून त्यांचे संवर्धन केले आहे. या अतुलनीय कामगिरी आणि अथक प्रयत्नांचे सर्व स्थरातून डॉ. ठोंबरे यांची कौतुक होत आहे.

डॉ. ठोंबरे यांनी हे पर्यावरण पूरक व हवामान बदल अनुकूल कार्य वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी व माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण यांच्या संकल्पनेतून तसेच तत्कालीन संचालक शिक्षण डॉ. धर्मराज गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. ते यांचे श्रेय विद्यार्थिनी, विद्यार्थी, मजूर, कर्मचारी, अधिकारी, प्राध्यापक व आम्ही अंबाजोगाईकर यांना देतात.

त्यांचे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कुलसचिव संतोष वेणीकर, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण, डॉ. मधुकरराव गायकवाड पं. उद्धवबापू आपेगावकर, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, राहुल सोनवणे, अनिलकुमार भिकने, डॉ. सोमनाथ रोडे, डॉ दिगंबर चव्हाण, कुणाल घुंगार्डे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, मुक्त पत्रकार रणजीत डांगे, प्रख्यात कवी राजेश रेवले, प्रसिद्ध गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे, साहित्यिक राजेंद्र रापतवार, डॉ. दीपक लोखंडे, डॉ. सुहास जाधव, श्री बाळासाहेब चिल्लरगे, श्री बाबासाहेब वारकरी, श्री अनिल खेडेकर,श्री सतीश गुंडावार, आदींनी अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## धोकादायक, मोडकळीस...

'तालुक्यातील १६ शाळांमधील ३० वर्गखोल्या, बीड तालुक्यातील २८ शाळांमधील ३७ वर्गखोल्या,धारूर तालुक्यातील १७ शाळांमधील ३० वर्गखोल्या,केज तालुक्यातील १९ शाळांमधील २२ वर्गखोल्या, गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या, माजलगाव तालुक्यातील १३ शाळांमधील २६ वर्गखोल्या, परळी तालुक्यातील ४६ शाळांमधील ८८ वर्गखोल्या, पाटोदा तालुक्यातील ३१ शाळांमधील ४० वर्गखोल्या, शिरूर तालुक्यातील २४ शाळांमधील ३२ वर्गखोल्या, वडवणी तालुक्यातील १३ शाळांमधील ४३ वर्गखोल्या एकुण ३४९

पान ४ वरून पुढे...

शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे. वायकर वस्ती येथे छत पडलेल्या वर्गात ज्ञानार्जन- बीड तालुक्यातील मांडवजाळी ग्रामपंचायत अंतर्गत पिंपळवाडी केंद्र अंतर्गत वायकर वस्ती येथील शाळेच्या एका वर्गाचे छत पुर्णपणे कोसळले असुन सध्या ज्या वर्गात मुलं ज्ञानार्जन करत आहेत त्या वर्गातील छत पडण्याच्या अवस्थेत असुन मुलांच्या जिवीताला धोका असुन शेतकरी ऊसतोड मजुरांच्या लेकरांनी पावसाळ्यात शाळा उघड्यावर कशी शिकायची असा संतप्त सवाल पालक दादु पवार,सुशीला बहिरवाळ, अमोल बहिरवाळ यांनी केला आहे. शाळांमधील वीजबील थकीत असल्याने ४९७ शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित असुन तातडीने वीज पुरवठा करण्यात यावा. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठाच नाही तर जिल्ह्यातील ४९७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. त्यामुळे संगणक,ई लर्निंग,एल ई डी टीव्ही, डिजिटल बोर्ड तसेच वीजेची उपकरणे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच बहुतेक शाळात अंधार आहे.अनेक शाळांच्या मागील भागात गवत आणि झाडेझुडपे असतात त्यातुन कधी विंचु तर कधी सापही शाळेत येतात. अंधार असल्याने अनेकदा दिसत नाहीत. वीज असेल तर अशा प्रकारचा धोका होणार नाही.शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर ....

पदवी, पदव्युत्तर, वैदकीय, व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील, अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीना महामंडळ कडून जेष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे दि. १८ जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संपूर्ण कागदपत्रासह मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीने जिल्हा कार्यालयाला संपर्क करावा. उशिरा आलेल्या कागदपत्र अर्जाचा जिल्हा कार्यालयामार्फत स्विकार करण्यात येणार नाही, असे कळविण्यात आले आहे. पुढीलप्रमाणे मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत. मार्कशीट अर्थात गुण प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन फोटो, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेटसह व जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज कागदपत्रासह कार्यालयात आणून दाखल करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे-सरपते यांनी केले आहे. जिल्हा कार्यालयाचा पत्ताः- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन शासकिय विश्राम गृह समोर बीड, फोन - ०२४४२-२२४९१६

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# परमपूज्य संत बाळूमामा पालखी क्र. ०३ महाप्रसादाचा आनंद घेण्यासाठी उपस्थित रहाण्याचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

परमपूज्य संत बाळूमामा पालखी क्र.०३ कदमवस्ती वडवणी येथे दि.१५/०६/२०२५ रोजी आली असता भावीक देखील बाळुमामाच दर्शन घेण्यासाठी व मेढ्या पाहाण्याची उत्सुकतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. परमपूज्य संत बाळूमामा पालखी ही भक्तांसाठी फक्त एक धार्मिक परंपरा असून आध्यात्मिक मार्गदर्शन करणारी यात्रा आहे. भक्ती, कीर्तन, नामस्मरण यांद्वारे भाविकांच्या मनात श्रद्धा व





अध्यात्म जागवते,

हा पालखी सोहळा, लोकांना एकत्र आणते. परमपूज्य संत, बाळूमामांचा संदेश सर्वसमावेशक आहे, त्यामुळे विविध समाजघटक या पालखीत सहभागी होतात. याम धून समाजात समभाव, सहकार्य आणि परस्पर आदर निर्माण होतो पालखीच्या दर्शनाने भक्तांचे जीवन चैतन्यमय होऊन दैन्य दूर होते.

तर रोज सकाळ संध्याकाळ पंगतीचे देखील नियोजन करण्यात आलेल आहे काल सकाळचे अन्नदाते प्रभु नागरगोजे व रात्रीचे अन्नदाते आसाराम परभळे यांची होती. आणि आज सकाळ पंगतीचे दावेदार बाळु लोकरे व रात्रीची पंगत अशोक लांडे, नामदेव लांडे, दादासाहेब कदम, दत्ता कदम यांची आज पंगत होईल पंगतीचे दावेदार यांनी प्रसादाचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहाण्याचे आव्हान केले आहे. सह.पो. नि. वर्ष व्हगाडे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, मा. नगरसेवक आत्माराम जमाले, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, पोलीस अम ालदार खरात साहेब मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### • सह.पो.नि वर्षा व्हगाडे यांची आरतीसाठी उपस्थिती राहणार

**सद्गुरू संत बाळूमामा च्या पालखी क्रमांक तीन च्या आरतीसाठी वडवणी पोलीस स्टेशनच्या सह पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा व्हगाडे या संत बाळुमामाची आरती साठी उपस्थित राहणार आहेत व भेट देऊन संत बाळूमामांना पुष्पहार अर्पण करून आरतीसाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार संभाजी लांडे यांनी दिली.**

**सद्गुरू संत बाळु मामाच्या पालखीत मला पंगत देण्याचा मान मिळाला खरं तर माझं भाग्य आहे सहजासहजी हा मान कुणाला मिळत नाही. तसेच पालखीचे क्र. ०३ चे संचालक व टिमचे यांचे खुप खुप आभारी आहे. – रामधन नागरगोर्जे पंगतीचे मानकरी**

## आरोग्य विभागातील कारभारावर संताप! वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांमध्ये अनियमितता; पदोन्नती प्रक्रियेला प्रशासनाचा दुटप्पी दृष्टिकोन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात गेल्या काही वर्षांपासून सुरु असलेल्या अनियमित कारभारावर आता कर्मचाऱ्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली आहे. वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांम धील विलंब व अनियमित मंजूरी प्रक्रिया आणि तब्बल ३-४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पदोन्नतीच्या फाईली यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गेल्या २-३ वर्षांपासून वैद्यकीय प्रतिपूर्ती (Medical Reimbursement) संबंधी अनेक फाईल्स प्रलंबित



असून, जे पैसे देतात, त्यांच्याच फाईल्स मंजूर केल्या जातात, असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. २६ एप्रिल २०२४ रोजी मंजूर झालेल्या फाईल सोडून, थेट ७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या नंतरच्या फाईल्सना मंजुरी देण्यात आली. यामध्ये पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असून, आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय बिल मंजूर होत नाही, अशी भावना कर्मचाऱ्यांम ध्ये रुजली आहे.

यासोबतच, विभागातील पदोन्नती प्रक्रियाही गेल्या ३-४ वर्षांपासून थांबलेली आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी सेवा पात्रता पूर्ण करूनही त्यांना वरिष्ठ पदांसाठी संधी मिळालेली नाही. यासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करूनही वरिष्ठ व आस्थापना अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही, ही बाब कर्मचाऱ्यांच्या मनोबलावर घाला घालणारी ठरत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, आरोग्य विभागातील या गंभीर व प्रलंबित बाबींवर तातडीने लक्ष देण्यात यावे. अन्यथा, कर्मचाऱ्यांना आपल्या हक्कांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. या पार्श्वभूम ीवर,उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैधकीय मदत कक्ष बीड व महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, शाखा बीड यांच्या वतीने प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची आणि सर्व प्रलंबित बाबींवर योग्य तो निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष एम. एम. वाघमारे यांनी सांगितले की, जर प्रशासनाने योग्य प्रतिसाद दिला नाही, तर आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही.

## महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना ही कामगारांची हित जोपासणारी संघटना: बाबूराव पोटभरे

### संघटनेच्या माध्यमातून आम्ही कामगारांचे प्रश्न मार्गी लावतो: नगरसेवक अमर शेख

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने नोंदणीकृत कामगार यांना माजलगाव येथे गृहुपोगी साहित्य बहुजन विकास मोर्चा संस्थापक अध्यक्ष बाबूरावजी पोटभरे यांच्या अध्यक्षा खाली संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांच्या प्रमुख उपस्थित वितरित करण्यात आले. या बाबत पोटभरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले समाजातील विविध घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र शासन यांचेवतीने कामगारांच्या हिता साठी जे पाठपुरावा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना करत आहे मी संघटनेचा कौतुक करेल भविष्य काळामध्ये जर आपण संघटित राहिलो तरच कामगारांचे अस्तित्व शिल्लक राहणार आहे असे परखड मत व्यक्त करून विविध संघटना व विविध चळवळी त्यांच्यामध्ये सुरू असलेले राजकारण, हेवेदावे यामुळेच कामगार वर्ग तसेच चांगल्या चळवळी अडचणीत येत असल्याचे




स्पष्टपणे बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे यांनी सांगितले. येणाऱ्या काळात संघटनेच्या माध्यम ातून रखडलेले प्रश्न मार्गी लाऊ असे आश्वासन महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष अमर शेख यांनी दिले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख. तर प्रमुख पाहुणे म्हणून मजलगाव येथील समाजसेविका संजीवनी राऊत, राष्ट्रवादी च्या नेत्या सौ.शितल धोंडरे. सुनीता नेटके. संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, उपध्यक्ष सय्यद आमेर हे होते या वेळी संयोजक शेख हमीद परमेश्वर साळुके यांनी सर्वांचा स्वागत करून कार्यक्रम संपन्न केले.

## शिवणी विद्यालयात प्रवेशोत्सव सोहळा व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था, बीड संचलित- शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमि क विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयात दि.१६/०६/२०२५ रोजी प्रवेशोत्सव सोहळा व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती, स्व.काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले. विद्यालयातील इ.५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य श्री. येडे व्ही. बी. यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. येडे व्ही. बी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन सर्वांना नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना चॉकलेट, खाऊ वाटप करुन राष्ट्रगिताने सांगता करण्यात आले. यावेळी विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

### शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात शेख अब्दुल रहीम यांचे सडेतोड विरोध; सत्य परिस्थितीची चौकशी करून न्याय देण्याची मागणी

## '...त्या ३५ शिक्षकांविषयी निलंबनाचे अन्यायकारक आदेश रद्द करा'

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत विविध पंचायत समि तीमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या २० शाळेवरील एकूण ३५ शिक्षकांविषयी पटसंख्या कमी करण्यास कारणीभूत ठरल्याचे आरोप करत त्यांना निलंबन करण्याची कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांनी निर्णय घेतला आहे व तसे आदेश सर्व गटविकास अधिकारी पंचायत समि ती यांना दिले आहे. जिल्हा परिषद बुलढाणा द्वारे हा अन्यायकारक आणि एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप करत, प्रसिद्ध शिक्षक नेते तसेच हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी या निर्णयाला जोरदार विरोध दर्शवला आहे.



त्यांनी आपल्या निवेदनात सांगितले की, या शिक्षकांना ना कसलीही पूर्वसूचना देण्यात आली, ना त्यांची बाजू ऐकून घेतली गेली. त्यामुळे हा निर्णय अन्यायपूर्ण असून तात्काळ मागे घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्टपणे अधोरेखित केले की, निलंबनासारखी कठोर शिक्षा देताना पुरावे, खुलासा व चौकशी या सर्व प्रक्रिया पार पाडल्या पाहिजेत. मात्र या प्रकरणात कोणतीही सुस्पष्ट चौकशी झाली नाही, हे खेदजनक आहे.

ते पुढे म्हणाले, शिक्षक हे समाज घडविणारे घटक आहेत. त्यांच्यावर अशा पद्धतीने शंका घेऊन, खोट्या आधारावर किंवा अपूर्ण माहितीच्या आधारे निलंबित करणे हे फक्त त्या शिक्षकांवरच नव्हे, तर संपूर्ण शिक्षक समाजावर अन्याय करणारे आहे. त्यांनी मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास सचिव, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण उपसंचालक, विभागीय आयुक्त अमरावती, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा, शिक्षणाधिकारी प्राथमि क जिल्हा परिषद बुलढाणा, तसेच सर्व संबंधित यंत्रणेसह शिक्षण विभाग व प्रशासनाकडे सदर कार्यवाही व आदेश रद्द करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## अवैधरित्या वाळुची चोरटी वाहतुक करणाऱ्या विरुध्द माजलगाव शहर पोलीसांची कार्यवाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक १५/०६/२०२५ रोजी माजलगाव शहर पोलीसांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे माजलगाव ते मंजरथ रोड लगत असलेल्या नवीन ईदगाह समोर ०५.५० वा ट्राक्टरमध्ये अवैधरित्या वाळुची चोरटी वाहतुक करणारे एक सोनालिका कंपनीचा ट्राक्टर क्रमांक चक १२ घग ८९९८ किमंती ३०००००/- व त्यामध्ये असलेली एक ब्रास वाळु किंमती ५०००/- रुपये असा एकुण ०३,०५,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन ट्राक्टर चालक १. संजय पांडुरंग अडागळे रा.मु. खापरवाडी पो. काडीवडगाव ता. वडवणी जि. बीड २. अश्फाक बेग अहेमद बेग रा. गांधणपुरा, माजलगाव (ट्राक्टर



मालक) यांचे विरुध्द गु.र.नं. २१९/२०२५ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, स.पो. नि. प्रल्हाद मुंडे, पोउपनि संदीप राठोड, पो. अंमलदार अमोल कदम, शिवगणेश मिरकले यांनी केली आहे.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ९१०/२०२५**

अर्जदार : १.दिपाली भ्र. देवदत्त कुलकर्णी, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला, ता. जि. बीड, ह.मु. तळेगांव दाभाडे, ता. जि. पुणे २. निखील पि. देवदत्त कुलकर्णी, वय ३७ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे देवदत्त पि. विश्वांभर कुलकर्णी हे दि. २६/१०/२०२४ रोजी ढाकणे हॉस्पीटल, तळेगांव दाभाडे, ता. जि.पुणे येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ हा मयताचा मुलगा आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक :- १७/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख :- २३/०७/२०२५.

**(मार्फत विधिज्ञ: - श्री एस. एस. महाजन)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**


## वडवणीत रामलिंग पतसंस्थेकडून गुणवंतांच्या पाठी कौतुकाची थाप

### विद्यार्थ्यांनी आवडीनुसार शिक्षण घेतल्यास यश हमखास - चेअरमन नारायण डिगे

**वडवणी । प्रतिनिधी**

आजचे युग हे स्पर्धेचे युग जरी असले तरी या स्पर्धेत इतरांशी स्पर्धा न करता प्रत्येकाने स्वतःशीच स्पर्धा केली पाहिजे. आपली बौध्दीक क्षमता ओळखून सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसारच शिक्षण घ्यावे. आपली आवड व कल विचारत घ्यावा. असे केले तर त्यांच्या यशस्वीतेचा मार्ग अधिक सुकर होईल. यशाचा यशोशिखर जिद्दीने, चिकाटीने व कठोर परिश्रम ने सहजरित्या गाठता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणालाच सर्वोच्च केंद्रबिंदू मानून पुढील वाटचाल करावी. आता जास्त गुण घेतले म्हणजे आपण खुप मोठी गोष्ट केली असे नसते त्यात सातत्य ठेवणे आव्हानात्मक असते. तसेच ज्यांना कमी गुण मिळाले आहेत त्यांनी निराश न होता यापुढे अधिक प्रगल्भतेने जास्तीत जास्त गुण कसे मिळविले जातील यासाठी प्रयत्न करत राहावे. आज रामलिंग पतसंस्थेने गुणवंतांच्या पाठी दिलेली ही कौतुकाची थाप निश्चितपणे आगामी काळात



सर्वांना दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन रामलिंग पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे यांनी गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांमध्ये नेहमी हिरारीने सहभागी होत वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने वेळोवेळी सामाजिक बांधिलकी ही जोपासली जाते. वडवणी शहर व तालुक्यातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन दरवर्षी रामलिंग पतसंस्थेच्या वतीने करण्यात येते. या अनुषंगाने यावर्षीही दिनांक १६ जून २०२५ सोमवार रोजी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहामध्ये इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या व इतर परीक्षेतील वडवणी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

CMYK

दैनिक
# मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com

बुधवार, दि.१८ जून २०२५ | पान ४

## सांची बुद्ध विहारात जेष्ठ पौर्णिमा उत्साहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरापासुन जवळच आसलेले सांची बुद्ध विहार, डॉ. आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भगवान बुद्धाच्या जिवनातील पौर्णिमांचे महत्व जाणुन वर्षाच्या बाराही पौर्णीमा विविध उपक्रमाने साजरा केल्या जातात याचाच एक भाग म्हणुन जेष्ठ पौर्णिमा मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली या निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे या होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तसेच कार्यक्रमाचे प्रस्तावीक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या कमलताई डोंगरे यांनी बौद्ध धम्मातील जेष्ठ पौर्णीमेचे महत्व या विषया वर सखोल मार्गदर्शन केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी नगरपालिकेचा कारभार म्हणजे दिव्याखाली अंधार

### शांतीवन स्मशानभूमीत अंधाराचे साम्राज्य



**परळी । प्रतिनिधी**

शांतीवन समशानभूमीत विजेचे खांब असून नसल्यासारखे, दि. १६ जून २५ रोजी त्याचाही प्रत्यय एका अंत्यविधी समई दिसून आला. विकासाच्या गप्पा मारणारे व विकास काम करणारे यांनी याकडे लक्ष देण्याची गरज. परळी शहरातील सर्वात मोठी असलेली स्मशानभूमी म्हणून शांतिवन स्मशानभूमी सर्वांना माहित आहे. एक काम उघडे केले की दुसरे काम समोर येते. दलित नगरपालिकेने फक्त बिले काढण्यासाठी आहे का? तोच दुसरी घटना लगेच समोर येते. रात्री आठच्या सुमारास शांतीवन स्मशानभूमी येथे एका युवकाच्या अंत्यविधी प्रसंगी उपस्थित असलेल्या प्रत्येकाला याचा प्रत्यय आला. स्मशानभूमी मध्ये रस्त्यावरचे सर्वच पथदिवे बंद,

▶▶ उर्वरित पान २ वर

# विविध मागण्यासाठी कास्ट्राईब संघटनेचे बेमुदत धरणे आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिक्षक कर्मचारी बांधवांचे गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषद बीड स्तरावर प्रलंबित असलेले निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी मिळून ३२ प्रस्ताव वैद्यकीय बिले ३९ प्रस्ताव व महागाई भत्त्याच्या संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याकारणाने महा. राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्रा.) यांना गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्यामार्फत निवेदन देण्यात



आले आहे. गटशिक्षणाधिकारी कार्यालया समोर नवीन शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्याच दिवसापासून म्हणजे १७ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत. वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियमित सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करून त्यांचे मूलभूत अधिकार डावलले आहेत. राज्य शासनाच्या नियमानुसार सेवा कालावधीनुसार निवड व वरिष्ठ वेतनश्रेणी बंधनकारक आहे. मात्र अनेक कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव विविध टप्प्यावर प्रलंबित असून, त्याचे निराकरण होत नाही.परिणामी कर्मचारी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत.तसेच शासकीय नियमानुसार अधिकृत रुग्णालयाम धून केलेले उपचारानंतर सादर केलेली वैद्यकीय बिले मंजूर करणे बंधनकारक असतानाही, महिन्यानंतरही ती मंजूर न होणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कर्ज काढावे लागत आहे. काही प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उपचारासाठी वेळेत मदत न मिळाल्याने गंभीर परिणाम झाले आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून महागाई भत्ता वेळोवेळी जाहीर केला जातो. मात्र संबंधित भत्याची अंमलबजावणी व आदा यामध्ये विलंब होत आहे. शासनाने २०२४ मध्ये महागाई भत्ते बाबत स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा ▶▶ उर्वरित पान २ वर

## जुना बाजार कोतवाली वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरु करा

### अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू : मनसे शहराध्यक्ष अमरजान पठाण

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक,कारंजा रोड,राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा तात्काळ काम सुरू करण्यात यावा अशी मागणी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगर परिषदेचे उपमुख्यअधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या एका निवेदनातून करण्यात आली आहे. असे की,बीड शहराच्या



मध्ये भागातून जाणाऱ्या शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा जुना बाजार कोतवाली वेस ▶▶ उर्वरित पान २ वर

## बावी गावात कृषीदुतांचे आगमन



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बावी येथे श्री. छत्रपती शाहू ,फुले आंबेडकर ,कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी कृषी दुतांचे बावी या गावात आगमन झाले आहे. यावेळी कृषीदुत रोहन शिंदे, सागर शिंदे,रितेश शिंदे, सुरज कदम,शुभम सावंत, अविनाश मुंडे ,अमन शेख, चैतन शिरसकर यांचे बावी गावातील गावकऱ्यांनी व शेतकरी बांधवांनी स्वागत केले कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ सर , प्रा. तांबोळी आय.एम ,प्रा. मिसाळ एल.एस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदुतांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२५ -२६ अंतर्गत शेतकऱ्यांना याबाबत सविस्तर माहिती दिली हे कृषीदुत २ महिने शेतकऱ्यांना शेती विषयी

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिना निमीत्त त्यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, महिला संघटिका मीराताई नवले, संदीप उबाळे, सतीश परदेशी, राजू हुरकुडे, गणेश लोणकर,रंगनाथ पैठणकर सह शिवसैनिक उपस्थित होते.*

# पाटोदा येथे प्रियदर्शनी प्राथमिक शाळेची नवीन इमारत उभारणार

### ●डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोद्यातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१७) पार पडले. पाटोदा शहरातील श्रीराम कॉम्प्लेक्समध्ये खाजगी जागेत आतापर्यंत ही



शाळा सुरू होती. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, या हेतूने आता संस्थेने स्वमालकीच्या जागेत ▶▶ उर्वरित पान २ वर

### पाटोद्यातील तिन्ही शैक्षणिक संस्थांना भेटी

**विनायक युवक कल्याण संस्था संचलित पाटोद्यातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, प्रियदर्शनी कन्या प्रशाळा, नवगण शिक्षण संस्था संचलित वसंतदादा पाटील महाविद्यालय या तिन्ही शिक्षण संस्थांना डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नवीन शाळा प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे स्वागत करून शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# डॉ. बाबासाहेब ठोंबरे 'आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स ने सन्मानित

### ●हरित प्राणवायू उद्यान व योगापार्क निर्माते: अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब ठोंबरे यांना रविवारी 'आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्डस् च्या' वतीने संत मुकुंदराज सभागृह अंबाजोगाई येथे, नालंदा फाउंडेशन बीड व आई फाउंडेशन अंबाजोगाई यांच्या



संयुक्त विद्यमाने आयोजित एका विशेष कार्यक्रमात प्रा. प्रदिप रोडे यांच्या हस्ते व सर नागेश जोंधळे, राजेंद्र घोडके, राहुल बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थित सन्मानित करण्यात आले. डॉ. ठोंबरे यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. डॉ. ठोंबरे यांनी हरित परिसर या जादुई कामाची मुहूर्तमेढ करोना योद्धा म्हणून महामारीच्या (मे- ,२०२० ते जून २०२२) या काळात करून, कृषि महाविद्यालय अंबाजोगाईच्या परिसरात देशी प्रजातीच्या २६००० हजार झाडांची व ४००० फुल झाडांची लागवड करून विद्यार्थी व सहकाऱ्यांच्या मदतीने संवर्धन केले आहे. यातून अंदाजे ११००० किलोग्रॅम ऑक्सिजन निर्मिती प्रति

▶▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशांच्या स्वागताचा 'इव्हेंट' बंद करून...

# धोकादायक, मोडकळीस आलेल्या सरकारी शाळांना भेटी देऊन मुलभूत सुविधा द्याव्यात: डॉ.गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने आयोजित काल दि.१६ सोमवार रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सवात जिल्हाधिकाऱ्यांचे १०० अधिकारी आणि लोकप्रतिनिधी शाळांमध्ये हजर राहिले यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारेगव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनावणे, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, आदींनी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याच वेळी

बीड जिल्ह्यातील जिल्हा



परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक,ई लर्निंग,वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने इव्हेंट करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांना भेटी देऊन शाळांची दुरूस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.जिल्ह्यात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन मोठा पाऊस अथवा वादळवारे आल्यास धोका निर्माण होऊ शकतो. जिल्हा परीषदेच्या शाळांच्या ईमारतीची दुरावस्था असुन कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत तर कुठे छत उघडे पडलेले तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांची अडचण होत असुन दुर्घटना घडल्यास यास जबाबदार कोण? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय मोडकळीस आलेल्या शाळा खालिल प्रमाणे आहेत. आष्टी तालुका ८० शाळांमधील ११९ वर्गखोल्या, अंबेजोगाइ

▶▶ उर्वरित पान २ वर

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करावे असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १८ जुलै २०२५, ही आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी,

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK